REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील मुंबईचा प्रश्न : ऐतिहासिक चिकीत्सा

प्रा. रवि आर. गावंडे
प्रमुख, इतिहास विभाग , जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय ,
दर्यापूर. जि. अमरावती.

**ABSTRACT :-**




संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही भारतात स्वातंर्त्या पुर्वीपासून अस्तित्वात होती. या चळवळीची सुरुवात मुख्यतः वऱ्हाड प्रश्नावरून झालेली आढळते. निजामाकडून हा प्रांत ब्रिटीशांनी आपल्याकडे घेतला. पुढे हा प्रांत तेथील लोकांच्या कुठल्याही भावनांचा विचार न करता मध्यप्रांताला जोडण्यात आला. स्वाभाविक मध्य प्रांतापेक्षा हा प्रांत मराठी बहुमूल मुंबई प्रांताला जोडला असता, तर नैसर्गिक झाले असते. परंतु हा प्रांत विसंगत मध्यप्रांताला जोडल्यामुळे मराठी मनाची तेथे घुसमट होत होती. त्यामुळे मराठी भाषिक लोकांचा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा अशी मागणी जोर धरू लागली होती. भारताला स्वातंर्त्य मिळाल्या नंतर ही चळवळ आणखी जोर धरू लागली. मुंबई महाराष्ट्रात सामील करण्यावरून मतभेद असल्याने यासाठी मोठे आंदोलन निर्माण झाले. दार कमिशनच्या अहवालामुळे स्थिती आणखीनच संघर्षाची झाली. या विषयावर सरकारला उच्चाधिकार कमिशन नेमावे लागले. परिणामी पुढे चळवळीला यश मिळून मराठी भाषिक मुंबईसह महाराष्ट्र १ मे १९६० रोजी अस्तित्वात आला.

**Keyword :-** संयुक्त महाराष्ट्र, वऱ्हाड, जवाहरलाल नेहरू, कॉंग्रेस पक्ष, महाविदर्भ चळवळ, दार कमिशन, राज्य पुनर्रचना आयोग, स. का. पाटील, बॅ. जयकर, श्री. देव, बॅ. रामराव देशमुख, सी. डी. देशमुख.

## प्रस्तावना :—

संयुक्त महाराष्ट्र आंदोलना सोबतच मुंबईचा प्रश्न वादाचा विषय झाला होता. मुंबई हा भाग मराठी असल्याने आणि तो महाराष्ट्राचा अविभाज्य भाग आहे. अशी भूमिका संयुक्त महाराष्ट्रवाद्यांनी घेतली होती. मात्र पं. जवाहरलाल नेहरू आणि इतर कॉंग्रेस श्रेष्ठी या मताच्या विरुद्ध होते. भाषिक तत्वावर आधारित प्रांत निर्मिती करणे म्हणजे राष्ट्रीयभावनेला नख लावण्यासारखे त्यांना वाटत होते. तसेच मुंबई मधील उद्योजक मंडळी, गुजराती समुदाय सुद्धा मुंबई महाराष्ट्रामध्ये सामील करण्याच्या विरोधात होते. परिणामी मुंबई करिता मोठे आंदोलन उभारण्यात आले.

मुंबईसह महाराष्ट्र हा चिघळत चाललेला प्रश्न आणि त्याबाबत शासनकर्ते कमालीचे उदासीन असल्यामुळे या आंदोलनात कमालीची तीव्रता आलेली होती. या बद्दल महात्मा गांधीना सुद्धा चिंता वाटत होती. त्यांनी या विषयावर २५ जानेवारी १९४८ रोजी "हरिजन" पत्रामध्ये मृत्युच्या केवळ पाच दिवसा पूर्वीच एक लेख लिहीला होता. या लेखामध्ये त्यांनी भाषावार प्रांत रचना हा सिद्धांत कॉंग्रेसने पूर्वीच स्वीकारला असल्याची आठवण करुन दिली होती. त्याच बरोबर मातृभाषेचे स्थान कोणतीही भाषा घेऊ शकत नाही अशी भूमिका सुद्धा मांडली होती.[1] परंतु पुढे महात्मा गांधीच्या विचारला तिलांजली दिल्या गेली.

जून १९४८ मध्ये माजी न्यायाधीश दार यांच्या अध्यक्षतेखाली "दार कमिशन" नेमण्यात आले. या कमिशन समोर सर्व पक्षांचे निवेदन व साक्षी झाल्या. त्यामध्ये गुजरात तर्फे मुंबई प्रश्नाला पुढे करून संयुक्त महाराष्ट्रला विरोध दर्शविण्यात आला होता. मुंबईसह महाराष्ट्र राज्य झाले तर गुजरात तुटीचे राज्य होईल, म्हणून मुंबई महाराष्ट्राला देण्यात येऊ नये अशी भूमिका घेतली. भाषेच्या आधारे राज्य निर्माण केल्यास ते राष्ट्रहिताच्या दृष्टीने अनुचित व धोक्याचे ठरेल, [2] असे नमूद करण्यात आले होते. मुंबई निर्माण करण्यामध्ये भांडवलदार आणि गुजराती व्यापारी यांचे योगदान आहे अशी त्यांची भूमिका होती. १९४८ च्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष रामराव देशमुख असताना त्यांनी मुंबईच्या भांडवलदारांची कानउघडणी करत म्हणाले होते की, 'उद्योगधंदे, व्यापार आणि त्या बरोबरच मुंबईसारखी शहरे ही केवळ त्यांच्या एकट्याच्या कर्तबगारीने उभारल्या गेली. व कामगार, करदाते, नागरिक आणि देशातील गिऱ्हाईक वर्ग यांचा काही हात, हिस्सा किंवा हितसंबंध कसा नाही ? [3] असा संतप्त सवाल त्यांनी केला होता.

१० डिसेंबर १९४८ रोजी दार कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाला. भाषिक मुद्यावर आधारित राज्य निर्माण करणे आणि मुंबईसह महाराष्ट्राची मागणी नाकारणारा आणि भाषावार प्रांत मागणी प्रादेशिकवादी व प्रतिगामी आहे. असा दार कमिशनचा अविचारी अहवाल प्रसिद्ध झाला. यावर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटली होती.[4] महाराष्ट्रातील जनतेने त्याला जोरदार विरोध दर्शविला, परिणामी कॉंग्रेसला सुद्धा हा अहवाल स्वीकारण्याचे धारिष्ट्य झाले नाही. शेवटी या मागणीचा विचार करण्यासाठी जे.पी.व्ही. समिती नेमण्यात आली. ही समिती मुंबईसह महाराष्ट्राविषयी काय भूमिका घेते याकडे सर्व महाराष्ट्राचे लक्ष लागले होते. आंध्र प्रांताला मान्यता मिळण्याची शक्यता सितारमय्या यांचा समावेश असल्यामुळे भाषिक प्रांत रचनेला अनुकूल निर्णय घेतले जातील अशी परिस्थिती निर्माण होऊ लागली होती. मात्र मुंबई विषयी त्यांची वृत्ती उदासीन होती. जे. पी. व्ही. समितीने आपला अहवाल ५ एप्रिल १९५२ रोजी सादर केला. संयुक्त महाराष्ट्र प्रश्नात मुंबई हा गुंतागुंतीचा प्रश्न असल्याचे म्हटले होते. तसेच मुंबई हे एक आंतरराष्ट्रीय शहर असल्यामुळे तसेच व्यापार व उद्योगाचे ठिकाण आहे. आणि येथे अनेक भाषेचे लोक राहतात त्यामुळे या शहराचा एकभाषिक राज्यात समावेश करण्याचा विरोध करण्यात आला. [5] त्यामुळे मुंबईच्या मागणीला हरताळ फासल्या गेला होता. त्यामुळे कॉंग्रेसवाद्यामध्ये नैराश्य पसरले.

मात्र मुंबई महानगरपालिकेत संयुक्त महाराष्ट्राचा मुंबईसह प्रस्ताव आचार्य अत्रे आणि आर. डी. भांडारे यांनी मांडला होता. आणि तो बहुमताने पारित झाला होता. [6] पुढे गुजरातची मागणी पुढे येत, मुंबई ही गुजरातला मिळावी अशी मागणी गुजरात तर्फे होऊ लागली. आणि मुंबई जर गुजरातला मिळत नसेल तर तिला स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश करण्यात यावा अशी भूमिका गुजरातच्या नेत्यांनी घेतली. पुढे १९५३ मध्ये नागपूर करार करण्यात आला आणि यामध्ये मुंबई, मध्यप्रदेश आणि हैद्राबाद राज्यातील मराठी भाषिक भाग मिळून महाराष्ट्र प्रदेश निर्माण करावा आणि त्याची मुंबई ही राजधानी असावी. अशा प्रकारचे कलम घालण्यात आले होते. मात्र या कलमावर कॉंग्रेस मुंबई प्रांताचे नेते स. का. पाटील यांचा विरोध होता. स.का. पाटील नागपूर करारावर टीका करत म्हणाले होते की, मुंबई शहराच्या भवितव्याचा विचार करताना मुंबई प्रदेश कॉंग्रेसच्या अध्यक्षास सुद्धा बोलविण्यात आले नाही. अशा लोकांनी घेतलेला निर्णय मुंबईला कधीच बंधनकारक असणार नाही. तसेच मुंबईत वेगवेगळ्या जाती धर्माचे लोक राहतात त्यांचा सांभाळ कोणत्याही भाषिक राज्याला करता येणार नाही. ज्यांना महाराष्ट्र हवा त्यांनी मुबई सोडून तो करावा [7] असे म्हणत त्यांनी विरोध केला होता. संयुक्त महाराष्ट्राबाबत विदर्भातील काही लोकांना अशी शंका व भिती वाटत होती की, पुणे – मुंबईकारांकडून आपणावर कुरघोडी करण्यात येईल, मात्र त्यामुळेच नागपूर करार करण्यात आला आहे. असे संयुक्त महाराष्ट्राचे समर्थक नानासाहेब गोरे यांचे मत होते.[8]

चिघळत चाललेला हा प्रश्न सोडविण्यासाठी २२ डिसेंबर १९५३ मध्ये राज्य पुनर्रचना समिती नेमण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला. या आयोगाचे अध्यक्ष फाजल अली असल्यामुळे त्यास 'फाजल अली कमिशन' म्हणून सुद्धा ओळखले जाते.[9] या कमिशन पुढे साक्ष देण्यासाठी तसेच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची बाजू भक्कमपणे मांडण्याचे कार्य धनंजयराव गाडगीळ यांच्या पुढाकाराने सुरु झाले होते. त्यानुसार "मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना व्हावी व त्याचबरोबर मराठवाडासह महाविदर्भाचा सुद्धा त्यामध्ये समावेश करावा अशी मागणी समिती पुढे ठेवण्यात आली. तसेच मुबई शिवाय संयुक्त महाराष्ट्र केवळ अश्यक्य आहे" अशी भूमिका घेतली. या समितीपुढे अनेक पक्षांच्या साक्षी झाल्या त्यामधील महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने मुंबई नैसर्गिक आणि औद्योगिक दृष्ट्या

महाराष्ट्राशी जुळलेली आहे. मुंबई आणि महाराष्ट्राचे नाते म्हणजे शरीराला शिर असते त्याच प्रमाणे आहे. मुंबईची भरभराट करण्यासाठी मराठीतर व्यापारी लोकांनी लावला. हा दावा खोटा असल्याचे निवेदनात म्हटले होते. गुजरात प्रदेश कॉंग्रेसच्या निवेदनात असे म्हटले होते की, मुंबई राज्य जसे आहे तसेच ठेवले पाहिजे, मात्र भाषिक तत्वावर राज्य निर्माण करायचे असल्यास मुंबई एक स्वतंत्र केंद्रशासित राज्य करावे अशी भूमिका घेतली. लोकनायक अणे आणि ब्रिजलाल बियाणी यांना मुंबईसह मराठी भाषिक राज्य बनावे मात्र विदर्भ त्यातून वेगळा काढावा असे वाटत असे. कमिशन मुंबईला आले असता तेथे मुंबई विषयीचा मुद्दा चर्चेला जाणार होता. तेव्हा मुंबईसह मराठी भाषिक राज्य निर्माण झाल्यास इतर भाषिक लोकांची भीती कमी करण्यासाठी, मुंबई महानगरपालिकेच्या अधिकारात वाढ, आणि मंत्री म्हणून मुंबईच्या प्रतिनिधीचा मंत्रिमंडळात समावेश करण्याचे लेखी आश्वासन परिषदेने द्यावयाचे ठरविले होते.[10] १० ऑक्टोबर १९५५ रोजी हा अहवाल प्रसिद्ध झाला. या अहवालात मुंबई केंद्राशासित राज्याचे अस्तित्व नाकारण्यात आले. मुंबई महाराष्ट्रात दिल्यास तिच्या विकासाला ते अयोग्य ठरेल. मुंबई प्रांतापासून दोन्ही भाषिक लोकांना लाभ मिळतो, म्हणून त्यांना मुंबई पासुन वेगळे करता येणार नाही. मात्र वेगळ्या विदर्भाची मागणी मान्य करण्यात आली. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र पुन्हा एकदा नाकारण्यात आला. त्यामुळे पुन्हा एकदा असंतोष वाढू लागला आणि पुन्हा महाराष्ट्रभर आंदोलने सुरु झाली.

या आंदोलनाकडे दुर्लक्ष करणे कॉंग्रेस पक्षाला जड जाऊ लागले. परिणामी पुन्हा चर्चांचे सत्र सुरु झाले. कुठल्याही परिस्थितीत मुबई वरील हक्क सोडायचा नाही, असे श्री. देव इ. मंडळीनी ठरवले होते. यातून महाराष्ट्रवादी आणि कॉंग्रेसश्रेष्ठी यांच्यात संघर्ष निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली.

पुढे त्रिराज्य योजना पुढ्यात मांडण्यात आली. मुंबईचे एक लहान राज्य, मराठीभाषिकांचा महाराष्ट्र आणि गुजरात राज्याची कल्पना त्यात समाविष्ठ होती. मुंबई मधील मजूर हा मोठ्या संख्येने मराठी भाषा बोलणारा होता. त्यामुळे त्याला स्वतंत्र केंद्रशासित मुंबई विषयी आपुलकी राहणार नव्हती. पुढे आणखी एक प्रवाह असा प्रसूत झाला की, मराठी भाषिक महाराष्ट्र आणि गुजरात असे राज्य निर्माण करून मुंबई ही या दोन्ही प्रांताची राजधानी व्हावी. मात्र यावेळी विदर्भात रामराव देशमुख आणि रा. कृ. पाटील यांची अशी भूमिका होती की, "विदर्भ गमवायचा नाही व मुंबई सोडायची नाही." त्रिराज्य ठरावाला अश्या प्रकारे मोठा विरोध झाला.

१८ नोव्हेंबर रोजी मुंबई विधानसभेसमोर या निर्णयाचा विरोध करण्यासाठी बंद पाळण्यात आला. २१ नोव्हेंबर १९५५ रोजी संघर्ष होऊन पोलिसांनी आंदोलकांवर अमानुष गोळीबार केला, त्यात पंधरा लोक मृत्यमुखी पडले. तर ३०० च्या वर लोक जखमी झाले. त्यामुळे ही चळवळ आणखीनच तीव्र झाली. त्रिराज्याचा ठराव मुंबई विधानसभेत मांडला असता तो फेटाळण्यात आला होता. मुंबई प्रदेश शेड्युल कास्ट फेडरेशनने सुद्धा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रास समर्थन दिले होते. मुंबईमध्ये पत्रकारांची सभा भरली असता महाराष्ट्र एकीकरणाचा ठराव पास करण्यात आला होता.[11] मात्र या पत्रकारांच्या परिषदेमध्ये विरोधी सूर सुद्धा होता. आणि बरेचशे पत्रकार विरोधात असल्याने विभागल्या गेले. परिणामी संयुक्त महाराष्ट्राचा ठराव ४३ विरुद्ध ३८ मतांनी निसटता पास झाला होता.[12]

परंतु परत एकदा मुंबईसह महाराष्ट्र मागणीला हुलकावणी देत पं. जवाहरलाल नेहरू यांनी मुंबई शहर केंद्रशासित राहील, आणि विदर्भासह संपूर्ण मराठी लोकांचा महाराष्ट्र आणि सौराष्ट्र, कच्छ सह गुजरात प्रांत निर्माण करण्याचे त्यांनी घोषित केले होते. त्यामुळे मुंबईसह महाराष्ट्रात सुरु असलेली आंदोलने आणखी तीव्र झाली. ही आंदोलने लोकांची भावना समजून न घेता मोरारजी देसाई यांनी चिरडून टाकण्याचा प्रयत्न चालविला होता. त्यामुळे मुंबई धुमसत होती. मुंबईसह महाराष्ट्र झालाच पाहिजे अशा घोषणा आंदोलनकारी देत होते. मात्र स.का. पाटील यांची भूमिका ठाम होती. कुठल्याही परिस्थितीत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही अशी वल्गना ते करीत असत. त्यामुळे वातावरण आणखीनच चिघळत होते. कॉंग्रेसची अशी ही आडमुठी भूमिका पाहून सी.डी. देशमुख यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. सी. डी. देशमुख यांनी जे लोकसभेमध्ये संयुक्त महाराष्ट्र मागणी करत मुंबई मधील अत्याचाराचा जणू पाढाच वाचला होता. यावेळी श्रेष्ठींच्या भीतीमुळे कॉंग्रेस जनांनी त्यांना समर्थन दिले नाही.[13] मात्र स. का. पाटील आणि मोरारजी देसाई यांची भूमिका नेहरुंच्या भूमिकेशी पूरक असणारीच होती. केंद्रातील सत्ताधीशांना प्रथम त्रिराज्य प्रस्ताव मान्य होत नाही, हे लक्षात आल्यानंतर ते द्विराज्य भूमिकेवर अडकून बसलेले होते. मुंबई केंद्रशासित करण्याच्या भूमिकेला विरोध म्हणून मुंबई महानगरपालिकेच्या ४२ सदस्यांनी राजीनामे दिले होते. यावरून मुंबई मधील बहुतांश लोक मुंबईस केंद्रशासित प्रदेश मानण्यास तयार नव्हते, त्यामुळे मुंबईसह महाराष्ट्र चळवळीला एकप्रकारे आणखी बळ मिळाले होते.[14]

अशा वातावरणात निवडणुका होऊ घातल्या होत्या, निवडणुकीमध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीला जनतेने भरघोस मदत केली. आणि निवडणुकीमध्ये त्यांचा प्रचंड विजय झाला. तर पुढे मुंबई महानगरपालिकेच्या निवडणूकासुद्धा समितीने जिंकल्या. ४ जुलै १९५७ रोजी मुंबई महानगरपालिकेमध्ये मुंबईसह महाराष्ट्र ठराव पारित करण्यात आला. याच वेळी प्रतापगडावर शिवाजी महाराजांच्या मूर्तीची प्रतिस्थापना पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते होणार होती. यावेळी प. नेहरूंच्या विरुद्ध घोषणा देण्यात आल्या. मात्र अशा प्रकारची निदर्शने करणे हे अनेक महाराष्ट्रवादी नेत्यांना आवडले नाही. तर बॅ. जयकर यांनी लोकांच्या मनातील अढी अशा प्रकारे बाहेर येत आहे, असे म्हणत कोणताही अनुचित प्रकार होऊ नये यांची खबरदारी घेण्याचे आवाहन केले होते.

शेवटी महाराष्ट्रातील जनतेच्या भावनेचा विचार करून मुंबई विधानसभेमध्ये द्विभाषिक राज्य भंग करण्याचा ठराव मांडण्यात आला. २८ मार्च १९६० रोजी लोकसभेमध्ये द्विभाषिक भंगाचे बिल मांडण्यात येऊन पुढे ते दोन्ही सभागृहात पारित झाले. आणि गुजरातचा प्रांत वेगळा करण्यात आला व उर्वरित मुंबई राज्याचे नामकरण महाराष्ट्र असे करून १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य उदयास आले. मुंबई महाराष्ट्राची राजधानी, तर नागपूर कराराच्या अंमलबजावणीतून नागपूर उपराजधानी झाली.

## निष्कर्ष :–

मुंबईच्या प्रश्नामध्ये सुरुवातीपासूनच दोन प्रवाह असल्याचे लक्षात येतात. यामध्ये राष्ट्रीय पातळीवरील विशेषतः कॉंग्रेस श्रेष्ठींची अशी धारणा होती की, भाषिक तत्वाच्या आधारे राज्य निर्माण करणे म्हणजे राष्ट्रवादाला मारक ठरणारे आहे. परंतु मागणी टाळता येत नाही, असे पाहून त्यांना आपल्या विचारामध्ये बदल करावा लागला. औद्योगिक आणि आर्थिक दृष्ट्या महत्वाची मुंबई कोणाला द्यावी हा मुख्यमुद्दा या चळवळीचा दिसतो. मुंबई महाराष्ट्राला मिळाली तर इतर भाषिक लोकांवर अन्याय होईल. अशी नाहक भीती कॉंग्रेस नेतृत्वाला, मुंबई मधील भांडवलदार, व्यापारी जणांना वाटत होती. परंतु ती अनावश्यक होती हे कालांतराने स्पष्ट झाले. मुंबई मिळविण्यासाठी रक्त सांडावे लागले. मात्र मुंबईचा हट्ट सोडला असता तर ही प्राणहानी टाळता येणारी होती.

## संदर्भ सूची :–

[1] हरिजन पत्रिका, दि. २५ जानेवारी १९४८
[2] फडके, य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ६, (१९४८–१९६०) मौज प्रकाशन मुंबई, २००७, पृ.१२
[3] संयुक्त महाराष्ट्र परिषद मुंबई अधिवेशन, बॅ. रामराव देशमुख यांचे अध्यक्षीय भाषण,मौज प्रिंटींग, मुंबई १९५८, पृ. १६
[4] फडके, य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ७, (१९४८–५६) मौज प्रकाशन, मुंबई, २००७, पृ.२८
[5] States Reorganization Commission Report of 1955. Page 119.
[6] पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, आ. दुसरी २०१०, पृ. ४२
[7] पेंडसे, लालजी (उपरोक्त), पृ. ७४
[8] नवयुग, २७ फेब्रूवारी १९५४
[9] फडके, य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ७, (१९४८–५६) मौज प्रकाशन मुंबई, २००७, पृ.१०८
[10] पेंडसे लालजी, (उपरोक्त), पृ. १२७
[11] उदय, आषाढ, शुक्ल २ शके १८६४
[12] धनुर्धारी, १० जून १९४२
[13] मांगले, म, लढा सायुक्त महाराष्ट्राचा आणि सीमाप्रश्नाचा, स्नेहल प्रकाशन पुणे, आवृत्ती प्रथम,२०१४, पृ.६४–६५
[14] पेंडसे लालजी, (उपरोक्त), पृ. ३५३



**प्रा. रवि आर. गावंडे**
**प्रमुख, इतिहास विभाग , जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय , दर्यापूर. जि. अमरावती.**